मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

ठछ्ख ठशसव छे.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक २८४ सातारा * बुधवार * दि. २६ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# विधान परिषदेसाठी आज मतदान!

## चार जागांसाठी सुशिक्षित मतदारांचा कौल कोणाला?

**मुंबई:** विधानसभेची रंगीत तालीम मानल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण पदवीधर, मुंबई शिक्षक आणि नाशिक विभागीय शिक्षक या चार जागांच्या निवडणुकीसाठी बुधवार, २६ जून रोजी मतदान होत आहे. राज्यातील सुशिक्षित मतदारांचा कौल कोणाला मिळणार, हे या निवडणुकीच्या निमित्ताने समजणार आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा या वेळेत चार जागांसाठी मतदान होईल. या निवडणुकीची मतमोजणी १ जुलैला होऊन निकाल जाहीर केले जातील, विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी पसंती क्रमाने मतदान होते. त्यामुळे या निवडणुकीची उत्सुकता आहे.

विधान परिषदेच्या चार जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीत मुंबई शिक्षक, नाशिक शिक्षक मतदारसंघात तिन्ही पक्षांचे उमेदवार एकमेकांसमोर आहेत, ही रणनीती असल्याचा दावा महायुतीकडून करण्यात आला आहे. मात्र, यात नेमकी कोणती रणनीती आहे, हे निकाल लागल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. दुसरीकडे मुंबई आणि कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीला एकसंघपणे सामोरे जाणाऱ्या सत्ताधारी महायुतीने मुंबई शिक्षक आणि नाशिक विभागीय शिक्षक मतदारसंघात एकमेकांसमोर उमेदवार उभे केले आहेत तर महाविकास आघाडीने महायुतीच्या विरोधात एकास एक उमेदवार दिला आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होईल, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे.

मुंबईत भाजपचे आव्हान

गेली ३० वर्षे मुंबई पदवीधर मतदारसंघावर वर्चस्व ठेवून असलेल्या उद्धवसेनेला भाजपने यावेळी आव्हान दिले आहे. मुंबई पदवीधरमध्ये एकूण आठ उमेदवार रिंगणात असून, मुख्य लढत ठाकरे गटाचे अनिल परब आणि भाजपचे किरण शेलार यांच्यात होणार आहे. मतदारसंघात १२ हजार पदवीधरांची नावे समाविष्ट करण्यात आली नाहीत, या अनिल परब यांच्या आरोपामुळे ही निवडणूक वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मुंबईतील १ लाख २० हजार ६७३ मतदार अनिल परब आणि किरण शेलार यांचे भवितव्य निश्चित करतील.

मतमोजणी - नेरूळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवनमध्ये १ जुलै, २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

हेल्पलाइन - मतदारयादी तसेच मतदान केंद्रासंदर्भात माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी हेल्पलाइन आहे. मतदाराचे नाव कुठल्या केंद्रात आहे किंवा आहे की नाही, याबाबतची माहिती हेल्पलाइनवर मिळू शकेल.

निरंजन डावखरे हॅट्ट्रिकवर - कोकण पदवीधर मतदारसंघात १३ उमेदवार असले, तरी महायुती विरुद्ध महाविकास आघाडी, अशी थेट लढत होणार आहे. निरंजन डावखरे सलग तिसऱ्यांदा ही निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे ते हॅटट्रिक साधतात का, याबद्दल उत्सुकता आहे.



**नैमित्तिक रजा सवलत**

अधिकाधिक मतदारांना मतदान करता यावे, यासाठी निवडणूक विभागाने यापूर्वीच २६ जून रोजी नैमित्तिक रजा जाहीर केली आहे: परंतु, खासगी आस्थापनांवर काम करणाऱ्या मतदारांना विशेष नैमित्तिक रजा लागू होत नसल्याने त्यांच्यासाठी मतदान कालावधीत दोन तासांची विशेष सवलत देण्यात आल्याचे कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य प्रशासन) तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी सांगितले.

**मुंबई शिक्षकमध्ये चौरंगी**

मुंबई विभागीय शिक्षक मतदारसंघात एकूण १३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यापैकी उद्धव ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिवाजीराव नलावडे, भाजपचे शिवनाथ दराडे आणि शिवसेना शिंदे गट पुरस्कृत शिवाजी शेंडगे आणि समाजवादी गणराज्य पक्षाचे सुभाष मोरे हे पाच प्रमुख उमेदवार आहेत. या मतदारसंघात एकूण १५ हजार ८३९ मतदार आहेत.

मुंबई पदवीधर - अनिल परब (उद्धवसेना) विरूद्ध किरण शेलार (भाजप)

मुंबई शिक्षक - जगन्नाथ अभ्यंकर (उद्धवसेना) विरूद्ध शिवाजी नलावडे (राष्ट्रवादी, अजित पवार गट) कोकण विभाग पदवीधर - रमेश कीर (काँग्रेस) विरूद्ध निरंजन डावखरे (भाजप)

## राजू शेट्टी यांची वाटचाल आव्हानात्मक

**कोल्हापूर :** सलग दुसऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये अपयश आल्यानंतरही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी हे लगेचच सक्रिय झाले आहेत. संघटनेची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय त्यांनी व्यक्त केला आहे. त्याची सुरुवात १ जुलैपासून वसंतराव नाईक शेतकरी कर्जमुक्ती आंदोलनाने पुसद (जिल्हा यवतमाळ) येथून केली जाणार आहे. सतत राजकीय भूमिका बदलत जाणाऱ्या शेट्टी यांना शेतकरी, जनतेचे पाठबळ कितपत मिळणार यावर त्यांची राजकीय दिशा अवलंबून असणार आहे.

पराभवानंतर माझं काही चुकले का, अशी समाज माध्यमात भावनिक पोस्ट करणाऱ्या शेट्टी यांना महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सरूडकर यांच्या पराभवासाठीच तुमची उमेदवारी जाणीवपूर्वक होती का, अशी विचारणा करीत आहेत. राज्य परिषदेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेत पुन्हा ऊर्जा भरण्याचा निर्धार करण्यात आला आहे. मरगळलेल्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य आणण्याचे आव्हान शेट्टी यांच्यासमोर असणार आहे. राज्यव्यापी दौरा केल्यानंतर शेतकरी, नागरिक यांची भूमिका समजून घेतल्यानंतर विधानसभा निवडणुकीची भूमिका स्वाभिमानी कडून स्पष्ट केली जाणार आहे. स्वबळावर लढायचे की महायुती - महाविकास आघाडी यांच्यासोबत जायचे याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे.

## आरक्षणाप्रश्नी लक्ष देण्याची लक्ष्मण हाकेंची मागणी; शरद पवार थेट बोलले

**मुंबई :** ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील वातावरण चांगलेच तापताना दिसत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलन करणारे लक्ष्मण हाके आणि मनोज जरांगे पाटील आक्रमकपणे भूमिका मांडत असून, आपापल्या मागण्यांवर ठाम आहेत. तसेच एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपही करताना पाहायला मिळत आहेत.शरद पवारयांनी आरक्षणप्रश्नी लक्ष घालावे, अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी केली होती. त्यावरशरद पवारयांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली.



शरद पवार यांनी सर्वपक्षीयांची एक बैठक बोलवावी. आमदार-खासदारांची बैठक बोलवावी. सगळ्या जबाबदार लोकांची बैठक बोलवावी. सामाजिक शास्त्रज्ञांची बैठक बोलवावी. इतिहास तज्ज्ञांची बैठक बोलवावी. प्रत्येक विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक बोलवावी. सगळ्या लोकांना एकत्र बसवावे आणि शरद पवार यांना सगळे लोक रिस्पेट करतील. आऊट ऑफ द जाऊन आदर देतील, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले. यावर संवाद साधत असताना शरद पवार यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली.ओबीसी किंवा मराठा घटक असो...राज्याचे मुख्यमंत्री सर्वपक्षीय लोकांची बैठक बोलाविण्याच्या विचारात आहेत. ज्याअर्थी त्यांनी पुढाकार घेतला आहे, त्याअर्थी आम्ही कुणीही या विषयात राजकारण आणण्याचा प्रश्न येत नाही. सामंजस्यातून पर्याय काढण्याच्या प्रयत्न होत असेल, तर आमची सरकारला साथ असेल. सामाजिक ऐक्याच्या संबंधी तडजोड नाही. ओबीसी किंवा मराठा घटक असो किंवा अन्य घटक असो त्यांच्यात एकप्रकारची दुही असणे ही राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. काहीही करायचे, पण आमच्यात एकवाक्यता राहिली पाहिजे, असे शरद पवार म्हणाले.दरम्यान, पुढचा धमाका होणार आहे. १३ तारखेपर्यंत गप्प आहे. मराठा समाजाला सरकारने फसवू नये. सगेसोयरेची अंमलबजावणी आमच्या म्हणण्याप्रमाणे झाली पाहिजे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. अंतरवाली सराटी येथे जाऊन बसणार आहे. आरक्षण मिळाल्याशिवाय माघार नाही. ६ जुलैपासून मराठा समाज जनजागृती रॅली जिल्ह्याजिल्ह्यात निघणार आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.



## पुणे महापालिकेचा अनाधिकृत हॉटेल, बार, पबवर हातोडा

**पुणे:** शहरातील हॉटेल, बार आणि पब मध्ये मोठया प्रमाणात बेकायदेशीरपणे ड्रग्स आणि मद्याची विक्री केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यानंतर फग्यसन कॉलेज रस्ता, शिवाजीनगर आणि खराडी येथील हॉटेल, पब, बार आणि रेस्टॉरंट यांच्या फ्रंट आणि साइड मार्जिन मध्ये विनापरवाना उभारण्यात आलेल्या शेडवर महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाई केली. एल ३ पबसह २९ ठिकाणी कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३६ हजार ८४५ चौरस फुट क्षेत्र रिकामे करण्यात आले.

गेल्या महिन्यात कल्याणीनगर येथील पोर्शे अपघात प्रकरणानंतर महापालिकेने शहरात रूफ टॉप हॉटेल, हॉटेल तसेच अनधिकृत पबच्या बांधकामांवर कारवाईचा बडगा उभारला होता. या कारवाईत सुमारे १४४ हॉटेलवर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर ही कारवाई थंडावली होती. मात्र, पुन्हा मंगळवारी थेट राज्यसरकारकडुन सूचना आल्याने महापालिकेकडून सकाळ पासूनच फर्गुसन रस्त्यापासून कारवाईस सुरूवात करण्यात आली. दिवसभरात बाणेर, खराडी, औंध, सिंहगड रस्ता, शिवाजीनगर या भागात अनधिकृत बांधकाम निर्मूलन पथकाने जोरदार कारवाई केली. या कारवाईत ९ हॉटेल, पब, बार आणि रेस्टॉरंट यांच्या फ्रंट आणि साइड मार्जिन मध्ये कारवाई केली. एल ३ पब मध्ये ड्रग्जची पार्टी झाली होती. त्या पबवर पालिकेने कारवाई केली. या पबचे अनाधिकृत बांधकाम तोडण्यात आले

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभाग सातत्याने हॉटेल, बार आणि रेस्टॉरंट यांच्यावर कारवाई करतो. पण त्यानंतर संबंधित हॉटेल चालक आणि मालक हे पुन्हा अतिक्रमण करतात. त्यामुळे पालिकेने या हॉटेलवर गुन्हा दाखल करणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया पालिकेने सुरू केली आहे. महापालिका यापुढे अशीच कारवाई च सुरू ठेवण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

शहरातील अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी पालिकेला पोलिसाचा बंदोबस्त घ्यावा लागतो. या बंदोबस्तासाठी पालिकेला पोलिसाकडे सातत्याने मागणी करावी लागते. पण आज पोलिस स्वताहुन पालिकेच्या बांधकाम विभागाला कुठे कारवाई करायची आहे बंदोबस्त हवा आहे का याची विचारणा करत होते.

## पाच दिवसांत नुकसानभरपाई द्या

### शेतकऱ्यांना मदतीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हा प्रशासनाला आदेश

**मुंबई :** राज्यातील शेतकरी, नागरिक यांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसानभरपाई आदी मदतीचे वाटप कोणत्याही परिस्थितीत ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच खरीप हंगाम दरम्यान खते, बियाणे यांचा काळाबाजार करणाऱ्या विक्रेत्यांबरोबरच कंपन्यांवरही कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी कृषी विभागाला दिल्या.



राज्यातील खरीप हंगामाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे -पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, पणनमंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, कृषी विभागाच्या प्रधान सचिव व्ही.राधा यांच्यासह विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा कृषी अधिकारी उपस्थित होते.

गेल्या वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यासाठी २२०० कोटींची मदत जाहीर करण्यात आली होती. त्यातील दीड हजार कोटी रुपयांचे वाटप झाले असून ज्या ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे तेथेही मदत वाटप सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे असे तालुके, जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या.

**बोगस बियाणे कंपन्यांवर कारवाई**

खरीप हंगामात बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. आपत्तीकाळात शेतीच्या नुकसानीच्या पाहणीसाठी सॅटेलाइट तंत्रज्ञानाचा वापर करावा अशा सूचना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. कृषी अधिकाऱ्यांनी क्षेत्रियस्तरावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. हवामान विभागाने जुलै महिन्यात ला निनोमुळे जोरदार पाऊस होण्याचा अंदाज वर्तविला आहे. अशा परिस्थितीत आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी दिल्या.

## राहुल गांधींनी ठरवली विधानसभा निवडणुकीची रणनीती

**नवी दिल्ली** - लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मिळालेल्या दमदार यशानंतरकाँग्रेसनंविधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मंगळवारी दिल्लीत राज्यातीलकाँग्रेसनेत्यांची वरिष्ठांसोबत बैठक पार पडली. आगामी निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच लढल्या जातील असं या बैठकीत ठरलं आहे. त्यानुसार लवकरच मित्रपक्षांसोबत समन्वयासाठी एक समिती बनवा आणि संयुक्त रणनीतीवर काम करा अशा सूचना काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना दिल्या आहेत.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे,राहुल गांधीयांच्या नेतृत्वात झालेल्या बैठकीत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षनाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात यांच्यासह पक्षातील इतर नेते आणि काही नवनियुक्त खासदारही सहभागी होते. या बैठकीत विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करण्यात आली. त्यात मविआतूनच निवडणूक लढवण्यावर काँग्रेस नेतृत्व आग्रही होते. त्याशिवाय माध्यमांसमोर कुठलीही भूमिका मांडताना एका पक्षाची नको तर महाविकास आघाडीची भूमिका असावी असंही नेत्यांना सांगण्यात आले आहे.तर महाराष्ट्रात आम्ही लोकसभा प्रतिकुल परिस्थितीत लढल्या. जनतेनं मविआला पाठिंबा दिला. महाराष्ट्राला देशातील विकसित आणि समृद्ध राज्य बनवायचं आहे. परंतु भाजपा सरकारने लोकांना महागाई आणि बेरोजगारीच्या संकटात टाकलं. राज्यातील शेतकऱ्यांवर सर्वात जास्त अन्याय झाला. देशात परिवर्तनाचं चित्र आहे महाराष्ट्राने याचे स्पष्ट संकेत दिलेत. आम्ही निवडणुकीच्या तयारीला लागलो आहे असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी म्हटलं आहे.मित्रपक्षांवर काँग्रेस नेते नाराजसूत्रांनुसार, पक्षाच्या बैठकीत काँग्रेसच्या काही नेत्यांनी ठाकरेंची शिवसेना आणि पवारांच्या राष्ट्रवादीबाबत तक्रारी मांडल्या आणि नाराजी जाहीर केली.

## संपादकीय

# आणीबाणीच्या आठवणी

आज देशातील लोकशाही व्यवस्था नेस्तनाबूत करून एकपक्षीय हुकूमशाही आड दडलेल्या एका व्यक्तीच्या हुकूमशाही कालखंडाच्या प्रारंभाला ४० वर्षे पूर्ण होत आहेत. बांगलादेशच्या निर्मितीच्या रुपाने सर्वसामान्य जनतेच्या हृदयसिंहासनावर १९७१ साली इंदिरा गांधी आरुढ झाल्या होत्या. देशहित लक्षात घेऊन पूर्वबंगाल आणि पंजाब अशा दोन संस्कृती अंगीकारणार्या पाकिस्तानच्या दोन भागांचे विभागीकरण करून स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती करण्याचे ऐतिहासिक कार्य इंदिरा गांधींनी पार पाडले असल्याने त्या लोकप्रियतेच्या शिखरावर आरुढ होत्या पण पाठोपाठ पुढे आलेली भ्रष्टाचाराची कोटीच्या कोटी उड्डाणे आणि वाढती एकाधिकारशाही यांच्या अंमलाने इंदिरा गांधी आणि त्यांचे कुटूंबिय यांच्या मनात नेमका काय हेतू आहे? आणि गांधी घराण्याची हुकूमशाही तर देशावर येणार नाही ना? या साशंकावस्थेत देशातील राजकारणीच नाही तर सामान्य जनता ही होती.

त्यातच गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन आणि पाठोपाठ एकाधिकारशाही आणि भ्रष्टाचार यांच्या अतिरेकाविरोधात जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेले देशव्यापी आंदोलन या सार्या विरोधी पार्श्वभूमीवर अलाहाबादच्या न्यायालयाने इंदिरा गांधीची निवडणूक अवैध ठरवणार्या आणि त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याच्या निर्णयाने शेवटची काडी टाकली आणि देशातील लोकशाही संपुष्टात आली.

देशभरात विरोधी पक्षीयांची धरपकड सुरू झाली. त्यात सातार्यातील कार्यकर्त्यांचाही समावेश होता. अर्थात जनसंघ आणि समाजवादी पक्ष जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाच्या पाठीशी होते. आणि डाव्या पक्षांपासून ते शिवसेनेपर्यंत सर्वच लहान मोठ्या पक्षांनी वैयक्तिक स्वार्थापोटी का असेना पण आणिबाणीचा पुरस्कार केला होता. हे वास्तव नाकारता येणार नाही. २५ जूनच्या मध्यरात्री आणिबाणी जाहीर झाली आणि वारेमाप अटक सत्र सुरू झाले. त्यात सुरुवातीला सातार्यातील भगवानदास गुजर, मुकुंदराव दाबके, अनंतराव शिकारखाने, दिनकरराव शालगर, किशोरपंत बापट, वडूजचे वसंतराव शेटे, डॉ. पेठे आदी अनेक मान्यवर रातोरात मिसाखाली गजाआड टाकले गेले. गजाभाऊ कुलकर्णी भूमिगत झाले आणि त्यांनी आणीबाणी विरोधात संघटित आवाज उठविण्यासाठी संपर्क मोहीम सुरू केली. आर्याग्ल वैद्यकमध्ये त्या काळात विद्यार्थी असलेल्या दिलीप येळगावकर याने आर्यांग्लमधील यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात आणीबाणीविरोधी घोषणा देत खळबळ उडवून दिली. खर्या अर्थाने येळगावकरांचा सामाजिक आणि राजकीय प्रवास येथून सुरू झाला.

उषा ताई कुबेर, ताई जकातवाडीकर आदी महिलाही या आंदोलनात मागे नव्हत्या. आणीबाणी विरोधी सत्याग्रहात उतरून या महिलांनी कारागृहाचा रस्ता पकडला. कारागृहात गेलेल्या अनेकांच्या कुटूंबापुढे घरातले कर्ते पुरुष कारावासात गेल्याने जगायचे कसे? हा प्रश्न उभा राहिला. कार्यकर्त्यांचे मनोबल टिकविण्यासाठी कुटूंबियांच्या पोटापाण्याची सोय करणे ही गरजेची गोष्ट होती.

यासाठीही उघडपणे राजकारणात नसणार्यांना पण लोकशाहीवर प्रेम असणारे समाजसेवक कार्यरत होते. आणि त्यांना आपली जमेल तेवढी मदत समाजही सढळपणे करत होता. या छुप्या निधी संकलनात त्या काळात डॉ. सुभाष दांडेकरांसारखे समाजकारणी अहोरात्र झटत होते. पोलिस यंत्रणेतील काही मोजके छुपेपण पण मोलाची मदत आंदोलनाला करत होते. नानाजी देशमुख, दत्तोपंत ठेंगडी यासारख्या राष्ट्रीयस्तरावरील त्या काळात भूमिगत झालेले नेते पोवईनाका परिसरात गुप्तपणे वास्तव्यास होते. याची खबरबातही कोणास लागली नव्हती एकूणच ते दिवस संघर्षाचे, संघटनेचे आणि लोकशाही वाचविण्यासाठी परस्पर सहकार्याचे होते. ४० वर्षानंतर त्या आठवणीं आजही ताज्या आहेत.

आज केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेले नरेंद्र मोदी, अरुण जेटली, प्रकाश जावडेकर, अनंतकुमार यासारख्यांपासून ते नितीन गडकरी, चंद्रकांत पाटील हे सत्तेचे रिंगणात असणारे सारे त्या काळात विद्यार्थी परिषदेच्या संबंधित होते. आणिबाणी जाहीर झाल्यावर यातले काही भूमिगत झाले. तर प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे कारागृहात गेले.

# तासगांवमधील सीसीटीव्हीबाबत हेल्पिंग हँडसची आक्रमक भूमिका

## तासगाव पोलीस निरीक्षकांना निवेदन ; आंदोलनाचा इशारा



**तासगांव :** तासगांव येथील हेल्पिंग हँडस फौंडेशन कडून शहरातील बंद स्थितीत असलेले सी सी टीव्ही कॅमेरे लवकरात लवकर सुरु करण्यात यावेत यासाठी तासगाव पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांच्याशी चर्चा व त्यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, तासगाव शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत आहेत या संदर्भात गेल्या आठवड्यात तासगाव शहरातील हेल्पिंग हँडस् फाउंडेशन यांनी अभ्यासपूर्ण भूमिका घेऊन त्या संदर्भात तासगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना निवेदन दिले होते. त्यांच्यात झालेल्या चर्चेनुसार आज तासगाव पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले. लवकरात लवकर तासगाव शहरातील सर्व कॅमेरे सुरू करण्यात यावेत अन्यथा हेल्पिंग हँडस् फाउंडेशनच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी निलेश दीक्षित, विशाल शिंदे, सुशांत पैलवान, पद्माक्ष जोशी, राजू मुल्ला, सुधीर रसाळ, प्रसाद पैलवान, अथर्व जोशी, श्रीकांत गायकवाड, शुभम भाट, अनिरुद्ध सुतार, प्रशांत पाटील, आदित्य माळी, संतोष घोडके, सागर डीगे, ऋतुराज गायकवाड हे सर्वजण उपस्थित होते.

# पन्हाळा ते पावनखिंड तीन राज्यस्तरीय पदभ्रमंती मोहिमांचे आयोजन

**कोल्हापूर :** इन रायडर्स एडवेंचर्स फाउंडेशन यांच्यावतीने जुलै महिन्यात पन्हाळा ते पावनखिंड तीन राज्यस्तरीय पदभ्रमंती मोहिमांचे आयोजन करण्यात आलय. या मोहिमे दरम्यान अनेक सामाजिक उपक्रम देखील

राबविण्यात येणार आहेत. यामुळे या मोहिमांसाठी युवकांनी मोठ्या संख्येन सहभागी व्हावं असं आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी केले.

इन रायडर्स एडवेंचर्स फाउंडेशन गेली ४० वर्ष सातत्याने पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन करते. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,

स्वामिनिष्ठ वीर, शिवा काशीद, नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्यासह शूरवीर मावळ्यांच्या इतिहास नव्या पिढीला माहीत व्हावा या उद्देशाने फाउंडेशनच्या वतीने गेली ४० वर्ष पन्हाळा ते पावनखिंड पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन करण्यात येते.

दरवर्षी प्रमाण याही वर्षी जुलै महिन्यात पन्हाळा ते पावनखिंड अशा तीन पदभ्रमंती मोहिमांचा आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षी या पदभ्रमंती मोहिमे दरम्यान गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, तसेच प्लास्टिक मुक्ती ,प्रदूषण हटाव यासारखे समाज प्रबोधन करणारे फलक ठिकठिकाणी लावण्यात येणार आहेत.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हिल रायडर्स फाउंडेशनच्या वतीने जुलै महिन्यात तीन पदभ्रमंती मोहिमेचा आयोजन करण्यात आले आहे. मोहीम सहा आणि सात जुलैला दुसरी २० आणि २१ जुलैला तर तिसरी मोहीम २७ आणि २८ जुलैला होणार आहे

# पिपाणी ने दिला तुतारीला झटका : शरदचंद्र पवार पक्षाचा दावा

**मुंबई:** पिपाणी आणि तुतारी यांच्या चित्रातील साधर्म्यामुळे लोकसभा निवडणुकीत आपल्याला फटका बसला असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पिपाणी हे निवडणूक चिन्ह गोठवावे, अशी मागणी शरदचंद्र पवार पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली आहे.

पिपाणीमुळे गेली साताऱ्याची जागा

सातारा लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे छत्रपती उदयन महाराज भोसले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांचा पराभव केला. शिंदे यांना छत्रपती उदयन महाराज यांच्या पेक्षा ३२ हजार ७७१ मते कमी पडली. याच मतदारसंघात पिपाणी या निवडणूक चिन्हावर संजय गाडे या अपक्ष उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. या उमेदवाराला ३७ हजार ६२ मते मिळाली. मतदारांनी तुतारी समजून पिपाणीला मत दिले. त्यामुळे शरद पवार गटाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांचा पराभव झाला, असा दावा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे

पिपाणी गोठविण्याची मागणी

आगामी विधानसभा निवडणुकीत पिपाणीचा फटका तुतारीला बसू नये यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आतापासूनच पावले उचलली आहेत. पक्षाने निवडणूक आयोगाला पत्र देऊन पिपाणी हे निवडणूक चिन्ह गोठवावे, अशी मागणी केली आहे. तुतारी वाजवणारा माणूस हे पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. तुतारी आणि पिपाणी यामध्ये साधर्म्य असल्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. हा संभ्रम टाळण्यासाठी पिपाणी हे निवडणूक चिन्ह गोठवावे, अशी मागणी पक्षाने निवडणूक आयोगाकडे पत्राद्वारे केली आहे.

## ज्येष्ठ नागरिक छळ जागृती दिनानिमित्त कार्यशाळा

**पुणे :** इंटरनॅशनल लॉन्जएटिव्हिटी सेंटर (इंडिया) आणि भारती विद्यापीठाचे न्यू लॉ कॉलेजच्या वतीने आणि घरडा केमिकल्सच्या सहकार्याने जागतिक ज्येष्ठ नागरिक छळ जागृती दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

राज्याचे माजी पोलीस महासंचालक तसेच इंटरनॅशनल लॉन्जएटिव्हिटी सेंटर (इंडिया)चे अध्यक्ष जयंत उमराणीकर,यशोदा पाध्ये,अंजली राजे यांनी उदघाटन सत्रात मार्गदर्शन केले.

भारती विद्यापीठ विधी विद्याशाखेच्या अधिष्ठाता आणि न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य डॉ.उज्ज्वला बेंडाळे अध्यक्षस्थानी होत्या. एकूण चार सत्रात ही कार्यशाळा झाली.

# आता संसदेत त्यांचा नव्हे तर आमचा आवाज घुमणार : संजय राऊत

**मुंबई :** या पुढील काळात सत्ताधाऱ्यांना लोकांच्या भावना दडपून टाकणे शक्य होणार नाही. यापुढे संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचा नव्हे, तर इंडिया आघाडीच्या २४० खासदारांचा आवाज घुमणार, अशा शब्दात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोदी आणि शहा यांना टोला लगावला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत सातत्याने सरकारवर करीत असलेल्या टीकेबद्दल त्यांच्यावर टीका केली होती. एक भोंगा थांबला तर दुसरा भोंगा रोज सकाळी वाजत आहे. या भोंग्याला बांबू घालणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले होते. त्यावर राऊत यांनी तशाच शब्दात मुख्यमंत्र्यांवर प्रतिटोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने त्यांना चांगलाच बांबू घातला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत तो आरपार निघणार आहे. या निवडणुकीत मतदार किंवा खुद्द मोदी, शहाच यांना रस्त्यावर आणतील आणि जनताच या गद्दारांना भर रस्त्यावर बांबूने सडकल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका राऊत यांनी केली.

विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे सरकार बेकायदेशीर आहे. घटनाबाह्य आहे. खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच ही बाब स्पष्ट केली आहे. तरीही हे निर्लज्जपणे सत्तेत बसले आहेत.

# पुढील काळात तिप्पट काम करू : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही



**नवी दिल्ली:** जनतेने सलग तिसऱ्यांदा विश्वास दाखवल्यानंतर आमची जबाबदारी अधिक वाढली असून या पुढील काळात अधिक जोमाने तिप्पट काम करू, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला दिली आहे.

आज पासून संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी देशातील जनतेला संबोधित केले. यावेळी सलग तिसऱ्यांदा आपल्यावर विश्वास दाखविल्याबद्दल त्यांनी जनतेचे आभार मानले. त्याचप्रमाणे विरोधकांकडून जनतेच्या अपेक्षा वाढल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा आपल्यावर विश्वास व्यक्त केला. याचा अर्थ देशातील जनतेला सरकारची ध्येयधोरणे मान्य आहेत. जनतेने सलग तिसऱ्यांदा निवडून दिल्यामुळे आपल्यावरील जबाबदारी वाढली आहे, हे नमूद करतानाच सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही आपापल्या जबाबदाऱ्या योग्य तऱ्हेने पार पाडाव्या, असे आवाहनही त्यांनी केले.

सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा संकल्प

सरकार स्थापन करण्यासाठी बहुमताची आवश्यकता आहे. मात्र, देशाचा कारभार चालविण्यासाठी एकमत आवश्यक आहे. त्यामुळे या पुढील काळात देशसेवा, देशाची प्रगती आणि देशातील

# जातीपातीचे विष पेरणाऱ्यांना दूर ठेवा : राज ठाकरे



**मुंबई:** समाजात जातीपातीचे विष कालवून त्यावर आपली राजकीय स्वार्थाची पोळी भाजणाऱ्यांना कटाक्षाने दूर ठेवा, असा सल्ला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेला दिला आहे.

आगामी विधानसभा निवडणूक पूर्वतयारीच्या दृष्टीने मनसेच्या प्रमुख नेते, पदाधिकारी यांची बैठक पार पडली. बैठकीनंतर ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील राजकीय, सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले.

राज्यात सध्या इतर मागास प्रवर्गातून आरक्षगं ण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू आहे तर ओबीसी आरक्षणात मराठ्यांची घुसखोरी नको, अशी भूमिका घेऊन प्रा. लक्ष्मण हाके उपोषण करीत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा आणि ओबीसी या समाज घटकात तेढ निर्माण झाल्याचे चित्र विशेषतः ग्रामीण भागात दिसून येत आहे.

कितीही आवडता असला तरी...

कितीही आवडता राजकीय पक्ष किंवा नेता असला तरीही तो जर राजकारणात जातपात आणत असेल तर त्याची अजिबात पाठराखण करू नका. राजकारणात जातीपातीला थारा देऊ नका, हे मी अनेक वर्षापासून सांगत आलो आहे. जातीच्या राजकारणामुळे मते गोळा करता येतात. भोळसट मतदार मतदान करतात ही. मात्र, त्यातून काहीही विधायक साध्य होणार नाही. पुढील पिढ्यांचे उज्वल भवितव्य घडवायचे असेल तर जातीपातीला राजकारणातून हद्दपार करा, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.

जातीपातीचे लोण शाळा कॉलेजपर्यंत

शाळेतील विद्यार्थी जातींवरून एकमेकांशी बोलत असल्याची चित्रफीत मला कोणीतरी दाखवली. हे भयानक आहे. समाजात जातीपातीचे राजकारण असेच फैलावत गेले तर ते शाळा, महाविद्यालयांपर्यंतच गेल्याशिवाय राहणार नाही, याची जाणीव आपण यापूर्वी अनेकदा आपल्या सभा, भाषणातून, मुलाखतीतून करून दिली आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी जातीचे राजकारण करणाऱ्यांना खड्यासारखे दूर ठेवा, असेही ठाकरे म्हणाले.

**वेळीच आवरले नाही तर....**

समाजात फैलावत जाणारे जातीपातीचे विष वेळेवरच आवरले नाही तर त्यावरून खून खराबा झाल्याशिवाय राहणार नाही. सध्या उत्तर प्रदेश, बिहारमध्ये जे घडत आहे ते या पुरोगामी महाराष्ट्रात घडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही ठाकरे यांनी यावेळी बोलताना दिला.

आत्ताच सगळं सांगू का?

आगामी विधानसभा निवडणुकीबाबत मनसेचे धोरण काय? राज्यात किती जागा लढवणार, असे प्रश्न पत्रकारांनी विचारले असता राज ठाकरे यांनी त्यांना, आत्ताच सगळं सांगून टाकू का, असा प्रतिप्रश्न केला. आजची बैठक ही विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी अंतर्गत बैठक होती. निवडणुकीच्या दृष्टीने मनसैनिकांसाठी काही कार्यक्रम, उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्याबाबत या बैठकीत पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. त्याच्या अंमलबजावणी बाबत काही शंका, सूचना असल्यास आमच्या भेटीगाठी होत राहतील. विधानसभा निवडणुकीबाबत सविस्तर माहिती योग्य वेळी पत्रकारांना दिली जाईल, असेही ठाकरे म्हणाले.

# नीट पेपरफुटी प्रकरणात जिल्ह्यात दोन दिवसापासून वेगवान हालचाली

**लातूर :** नीट पेपरफुटी प्रकरणात जिल्ह्यात दोन दिवसापासून वेगवान हालचाली सुरु आहेत. दोन जणांविरोधात गुन्हा दाखल झाला असून आरोपींची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे. शनिवारी सकाळपासून नीट पेपर फुटी प्रकरणी विविध घडामोडी घडत आहेत. मात्र पोलिसांकडून कोणतीही अधिकृत माहिती दिली जात नसल्याने संभ्रम वाढत चालला आहे. रविवारी रात्री नऊ वाजल्यापासून दोन वाजेपर्यंत वेगवान हालचाली झाल्या आहेत.

शनिवारी एटीएसने चौकशी करून सोडून दिलेल्या दोन शिक्षकांपैकी जलील पठाण या शिक्षकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी शहर पोलीस उपाधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांसमोर पठाण यांची चौकशी करण्यात आली. रात्री बारानंतर पोलिसांनी तपासासाठी विविध पथके तयार केल्याची माहिती आहे.. याबाबत कोणतीही अपडेट देण्यास पोलीस तयार नाहीत. मात्र पेपर फुटी प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शनिवारपासून आतापर्यंत यात किती लोकांची चौकशी झाली, किती लोकांविरोधात गुन्हा दाखल झाला याबाबत स्पष्टता नाही. मात्र जाधव आणि पठाण यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असल्याची खात्रीलायक माहिती आहे. शनिवारी सकाळपासून नांदेड येथील पथक लातूर शहरात माहिती घेत होते, तपास करत होते. त्यानंतर त्यांनी पठाण आणि जाधव नावाच्या दोन जिल्हा परिषद शिक्षकांना चौकशीसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणले. त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्या मोबाईलमधील डेटाची माहिती घेण्यात आली. यानंतर दोघांनाही सोडण्यात आलं होतं.

या दोन शिक्षकांपैकी पठाण यांनी माध्यमासमोर येत मला चौकशीसाठी बोलवलं होतं. पोलिसांनी सन्मानाने मला रात्री घरीही सोडले होते अशी माहिती दिली. विनाकारण माझी बदनामी केली जात असल्याची तक्रारही केली होती. या सर्व बाबी संध्याकाळी पाच वाजता त्यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केल्या होत्या. मात्र त्यानंतर अवघ्या तीन तासांत पठाण यास पोलिसांनी ताब्यात घेतले, गुन्हाही दाखल केला. पोलीस अधीक्षकापासून विविध अधिकारी आणि पथकांनी कसून चौकशी केली. या प्रकरणातील दुसरे शिक्षक जाधव हे पोलिसांच्या ताब्यात आहेत का याबाबतची माहिती मात्र पोलिसांनी दिली नाही. त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोन शिक्षकांपैकी एक जण लातूरचा तर एक सोलापूर येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत आहे. लातूरमध्ये राहणारे संजय जाधव हे मूळचे बोथी तांडा (ता. चाकूर) येथील रहिवासी आहेत. सध्या सोलापूरच्या टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. लातूरच्या अंबाजोगाई रोड भागात राहणारे जलील उमरखाँ पठाण हे तालुक्यातील कातपूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या परीक्षेत (नीट) घोटाळा झाल्याचा आरोप होत आहे. लातूरमध्येही नीट आणि जेईईच्या तयारीसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी खासगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेत असतात. त्यामुळे परीक्षा गैरव्यवहारात या शहराचे काही धागेदोरे आहेत का या दृष्टीने तपास सुरू होता. शनिवारी रात्री नांदेड एटीएसच्या हाती हे दोघे शिक्षक लागले. त्यानंतर चौकशी करून त्यांना सोडण्यात यावं होतं. मात्र रविवारी संध्याकाळी पुन्हा यातील पठाण नावाच्या शिक्षकांना पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात दोनपेक्षा अधिक लोकांचा समावेश असल्याची शक्यता नाकारता येत नाही.. त्याही अनुषंगाने पोलिसांचा तपास सुरू आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# भोरला महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन



**भोर :** मागील सहा महिन्यांपासून भोर तालुक्यात विजेचा लपंडाव सुरू असल्याने वीज ग्राहकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.दरम्यान छोटे-मोठे उद्योग व्यवसायिक,शेतकरी यांचे व्यवसायावर परिणाम होऊन मोठे आर्थिक नुकसान झाल्याने भोर शहर व तालुक्यातील वीजपुरवठा सुरळीत करणे आणि अकार्यक्षम अधिकारी यांच्या प्रशासकीय बदलीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्याचे लेखी आश्वासन वीजवितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, सासवड यांनी दिल्यावर युवक काँग्रेसचे ठिय्या आंदोलन तातपुरते स्थगित करण्यात आले.

भोर शहर आणि तालुक्यात चाललेला विजेचा लपंडाव सुरू असून महावितरणकडून पावसाळ्या पूर्वीची कामे झाली नाहीत. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत व्हावा आणि अकार्यक्षम अधिकाऱ्यांची त्वरित बदली करावी, या मागणीसाठी पुणे जिल्हा व भोर तालुका युवक काँग्रेसच्या वतीने भोर तालुका वीजवितरण कंपनीच्या भोंगळ कारभारा विषयी घोषणाबाजी करत राजवाडा चौकात तहसील कार्यालयासमोर सोमवार (दि.२४) रोजी ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले होते. काही तासांच्या ठिय्या व निषेध आंदोलनानंतर अकार्यक्षम अधिकारी यांच्या प्रशासकीय बदलीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालया कडे पाठविण्याचे लेखी आश्वासन वीजवितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, सासवड यांनी दिल्यावर युवक काँग्रेसचे ठिय्या आंदोलन तातपुरते स्थगित करण्यात आले.

यावेळी भोर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष शैलेश सोनवणे, पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष महेश टापरे, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष नितीन दामगुडे, विठ्ठल आवाळे, पोपट सुके, उत्तम थोपटे, अतुल किंद्रे, आनंद आंबवले, संपत दरेकर,अशोक वाडकर, महेश धाडवे, अनिल सावंत, विजय शिरवले, नीलेश भोरडे, जगदीश किरवे, सुमंत शेटे, देवीदास गायकवाड, सुरेश राजिवडे, अंकुश खंडाळे, समीर सागळे, नितीन बांदल, सुभाष कोंढाळकर, राजाराम तुपे, तौसिफ आतार, अक्षय वाघमारे, संतोष केळकर, प्रमोद थोपटे, दीपक कुमकर, परवेज शेख, सुधीर खोपडे, महेश भेलके, बाबू दिघे, रोहित शिंदे, राजाराम तुपे, श्यामराव जेधे, गोरख मानकर, नरेश चव्हाण, मधुकर कानडे, यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**१० जुलैपर्यंत होणार कार्यवाही**

दरम्यान, महावितरणचे कार्यकारी अभियंता अरविंद वनमोरे यांनी पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष महेश टापरे यांना दिलेल्या लेखी आश्वासनात म्हटले आहे की, मागील काही दिवसांत वादळी वारा व पावसामुळे विजेचे खांब पडून वीजपुरवठा विस्कळीत झाला होता. सदरची दुरुस्ती पूर्ण झाली आहे. शहर व ग्रामीण भागातील वीजपुरवठा अंखडित व सुरळीत ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या असून भविष्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच उपकार्यकारी अभियंता अरविंद अंभोरे यांच्या प्रशासकीय बदलीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करून १० जुलैपर्यंत योग्य ती कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर युवक काँग्रेसच्या आंदोलनाला यश आले असून ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

# राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना १ मार्चपासून सुधारित पेन्शन योजना

**मुंबई :** राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना १ मार्चपासून सुधारित पेन्शन योजना पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांनी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या प्रतिनिधींच्या बैठकीत दिली. या निर्णयाचा फायदा राज्यातील सुमारे आठ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना होणार आहे. केंद्राप्रमाणे चार टक्के महागाई भत्ता त्वरित मंजूर करण्यात येणार असून, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्री पातळीवर सादर करण्यात आला आहे, अशी माहितीही या बैठकीत देण्यात आली.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या प्रतिनिधींची बैठक करीर यांच्या दालनात बैठक झाली. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत संबंधित विभागाकडून प्रस्ताव आल्यास योग्य विचार होईल, वाहनचालकांची रिक्त पदे भरण्याबाबत सद्यस्थितीचा अभ्यास करून निर्णय घेण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांना वाढीव बालसंगोपन रजा देण्याबाबत अभ्यास करून निर्णय घेतला जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आल्याचे संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर यांनी दिली. कंत्राटी व योजना कामगारांना संबंधित विभागाच्या मागणीनुसार त्यांची सेवा नियमित करण्याचे धोरण राबवले जात आहे. तर, राज्यातील सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित पेन्शनसंदर्भात लवकरच अधिसूचना जाहीर होण्याची चिन्हे आहेत, असेही यावेळी सांगण्यात आले.

# सुमारे ५,००० स्त्री-पुरुष वारकऱ्यांना पोशाख देऊन आमदार शेळके यांनी व्यक्त केली कृतज्ञता



**वडगाव मावळ :** पंढरीची पायी वारी करीत वारकरी संप्रदायाची परंपरा अखंड सुरु ठेवणाऱ्या मावळ तालुक्यातील सुमारे ५,००० स्त्री पुरुष वारकऱ्यांना त्यांच्या गावात जाऊन पोशाख प्रदान करीत आमदार सुनिल शेळके यांनी समस्त वारकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

आमदार शेळके यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या श्री विठ्ठल परिवार मावळ,सकळ दिंडी नियोजन समिती यांच्या वतीने गेली काही वर्षे हा उपक्रम राबवण्यात येत आहे. आमदारांनी प्रत्येक गावात पोशाख पाठवून सन्मान केल्याबद्दल तालुक्यातील वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

मावळ तालुका दिंडी समाजाचे अध्यक्ष हभप तुकाराम महाराज गायकवाड म्हणाले की,पायी वारीची परंपरा मावळ तालुक्यातील हजारो वारकऱ्यांनी आजही जपली आहे आणि या वारकऱ्यांची सेवा करण्याचे महान कार्य आमदार सुनिल शेळके विविध माध्यमातून कायमच करत आले आहेत. त्यांच्या या सेवाकार्याला आमच्या नेहमीच सदिच्छा आहेत.

मावळ तालुक्याला असा आमदार लाभला आहे ज्यांचे वारकरी संप्रदायासाठी खूप योगदान आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने मावळातील पाच हजार पुरुष महिला वारकऱ्यांना घरपोच पोशाख देऊन त्यांनी सन्मानित केले.खुप समाधान वाटले. सर्व वारकऱ्यांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी नेहमी आहेत,अशा भावना श्री क्षेत्र घोरावडेश्वर दिंडीचे अध्यक्ष हभप मुकुंद नाना राऊत यांनी व्यक्त केल्या.

श्री विठ्ठल परिवार मावळ, सकळ दिंडी नियोजन समिती यांच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.अखंड हरिनाम सप्ताह, उन्हाळी सुट्टीत बाल वारकरी प्रशिक्षण शिबिर, तालुकास्तरीय भजन स्पर्धा, विणेकरी सन्मान, भव्य कीर्तन महोत्सव अशा उपक्रमांना

# जुण्या जाणत्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणून त्यांना सक्रीय करण्याचे काम एकदिलाने करूया : नरेश देसाई

**पाटण :-** राज्याचे नेते माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज(बाबा) चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पाटण शहर व तालुक्यातील पक्ष संघटना मजबूत करून जुण्या जाणत्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणून त्यांना सक्रीय करण्याचे काम एकदिलाने करूया असे आवाहन सातारा जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस नरेश देसाई यांनी पाटण शहर काँग्रेसने आयोजित केलेल्या बैठकीत बोलताना केले,

त्यावेळी जेष्ठ नेते माजी सभापती एल.एम.पवार,माजी जि.प.सदस्य अरविंद घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



बैठकीत मार्गदर्शन करताना नरेश देसाई.

यावेळी बोलताना नरेश देसाई म्हणाले की पाटण शहर व तालुक्यात काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते पदाधिकारी पक्षाच्या प्रवाहापासून दूर आहेत.त्यांच्या सर्वांना विश्वासात घेऊन पुन्हा काँग्रेस पक्षात सक्रिय करण्याची आवश्यकता आहे.तालुक्यातील गांव - वाडी वस्तीवरील प्रत्येक गावात काँग्रेसचा कार्यकर्ता देवून नेता आहे.त्या कार्यकर्त्यांकडे आपले राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांचा विश्वास व आपले नेते आ.पृथ्वीराज (बाबा) याचे विचार पोचविणे गरजेचे आहे.त्यासाठी येत्या महिनाभरात तालुक्यातील प्रत्येक प.स.गण व जि.प.गट निहाय संपर्क दौरा काढून त्या कार्यकर्त्यांना काँग्रेसकडे काम करण्याची संधी देऊ. त्यावेळी बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्ते यांची लोकसभा निवडणूकीत काँग्रेस पक्षाकडून कोणतीच विचारणा झाली नसल्याची खंत व्यक्त केली.

या बैठकी दरम्यान जेष्ठ नेते माजी सभापती एल.एम. पवार,माजी जि.प.सदस्य अरविंद घाडगे अड.राजन भिसे, पाटण शहरचे अध्यक्ष दर्शन कवर,विष्णू सपकाळ,जेष्ठ कार्यकर्ते विठ्ठल बाबर,आंनदा कांबळे यांनी आपले विचार मांडून तालुक्यात पक्ष वाढीसाठी काम करण्याचे आश्वासन दिले.

त्यावेळी उपस्थित जेष्ठ कार्यकर्ते विठ्ठल बाबर, हमीदभाई मुकादम ,हरिश शिंदे,भरत पवार ,सुर्यकांत सुतार,सयाजी बाबर,दिपक वायदंडे,सुधाकर बाबर,यशवंत बाबर,इकबाल सय्यद व सर्व काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवैद्यरित्या चालणारे दारू धंदे बंद करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन

**पाटण :** पाटण तालुक्यातील कोयना व काजळी विभागातील अवैद्यरित्या चालणारे दारू धंदे बंद करा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करू असा इशारा शिवसेसेनेच्या ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कोयना पोलीस स्टेशनला निवेदनाव्दारे केली आहे.



निवेदन देताना युवासेना, शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते.

कोयना पोलीस स्टेशनच्या हद्दीत अनेक अवैद्य धंदे सुरू असुन ते बंद व्हावेत यासाठी शिवसेनेच्या युवासेनेने अनेकदा तोंडी व निवेदनव्दारे मागणी केली होती मात्र हे धंदे सुरू असलेनं अनेकाचे संसार देशोधडीला लागले आहेत तर महिला व कुटुंबियाना त्रास सहन करावा लागत आहे

यासाठी सोमवारी शिवसेनेचे पदाधिकार्यानी कोयनानगर पोलिस ठाण्याचे ठाणे अंमलदार टिळेकर यांना निवेदनव्दारे अवैद्य धंदे बंद करणेची मागणी केली असुन धंदे बंद झाले नाहीतर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान यावेळी शिवसेना युवा सेनेच्या मागणीनुसार पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार टिळेकर यांनी अवैद्य धंदे बंद करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी युवासेना पाटण तालुका प्रमुख अक्षय कदम शिवसेना विभाग प्रमुख महेश शेलार , कोयना विभाग संघटक प्रदीप निंबाळकर , सुरेश जाधव, किसन सुतार, मयूर मरागजे, पांडुरंग कदम ,रोहन सावंत आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# गळा आवळून खून

**पुणे :** पिंपरी चिंचवड परिसरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन महिन्यांपूर्वी लग्न झालेल्या विवाहितेचा तिच्या नवऱ्याने गळा आवळून खून केला आहे. विवाहबाह्य संबंध असल्याच्या संशयावरुन देहूगाव परिसरात असणाऱ्या गाथा मंदिराच्या मागे फिरण्याच्या बहाण्याने पत्नीला घेऊन जाऊन तिचा खून केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

प्रतीक्षा जयदीप यादव (वय २१) असे खून झालेल्या विवाहितेचे नाव असून या प्रकरणी आरोपी पती जयदीप अर्जुन यादव (वय ३०) याला देहूरोड पोलिसांनी अटक केली आहे. खून केल्यानंतर जयदीप याने पुरावा नष्ट करण्यासाठी दोघांचे मोबाईल इंद्रायणी नदीत फेकून दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी आरोपीला २७ जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पोलीस अंमलदार किरण राजाभाऊ पाटील यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगली जिल्ह्यातील जयदीप यादव याने डिप्लोमा इंजिनिअरिंग केले होते, अशी माहिती समोर येत आहे. त्याचा प्रतीक्षा हिच्यासोबत दोन महिन्यांपूर्वी विवाह झाला होता. वडिलांनी मुलीला एमएससी पर्यंत शिक्षण देऊन उच्चशिक्षित केले होते. जयदीप हा पुण्यात कामाला होता.



# रायगडावर विवेकानंद केंद्राच्या युवा नेतृत्व विकसन उपक्रमाचा प्रारंभ

## प्लास्टिक कचरासंकलन, पुस्तक, भित्तीपत्रकाचे प्रकाशन

पुणे : छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद यांच्या जयघोषात दुर्ग दुर्गे श्वर श्री रायगडावर विवेकानंद केंद्र कन्याकुमारी महाराष्ट्र प्रांताच्या युवा नेतृत्व विकसन उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. राज्यभरातून आलेल्या ३४० युवक - युवतींनी गडावर चढाई करतानाच प्लास्टिक कचरा गोळा केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सान्निध्यात राष्ट्रसेवेसह वैयक्तिक संकल्प केले. यावेळी उपक्रमासाठीच्या पुस्तकाचे व भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. रविवार,दि.२३ जून रोजी दुपारी हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी केंद्राचे प्रांत सहसंघटक सुमीत शिवहरे, निधी संकलन प्रमुख संजय कुलकर्णी, कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. देवगिरी विभाग युवाप्रमुख लखन अवस्थी यांनी प्रास्ताविक केले. वैदेही पाठक हिने' शिवदुर्गेच्या दूतांची' हे गीत गायिले. चित्रा सेनगावकर हिने विवेकवाणी म्हटली. केंद्र प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

गेल्या २९ वर्षांपासून विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांताकडून महाविद्यालयीन युवक - युवतींच्या व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकसनासाठी युवा नेतृत्व विकसन उपक्रम राबविण्यात येत आहे.जुलै ते डिसेंबर दरम्यान उपक्रम प्रक्रिया चालणार आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त यंदा युवा नेतृत्व विकसन उपक्रमांतर्गत ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर लिखित अष्टावधानी शिवराय या पुस्तकावर आधारीत परीक्षा घेण्यात येणार आहे. या पुस्तकासह भित्तिपत्रकाचे केंद्राच्या प्रांत संघटक सुजाता दळवी, प्रांत युवाप्रमुख सुनील कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

युवा नेतृत्व विकसन शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन

युवा नेतृत्व विकसन उपक्रमाची प्रक्रिया जुलै ते डिसेंबर २०२४ दरम्यान सुरु राहणार आहे.वरिष्ठ महाविद्यालयीन युवक - युवतींसाठी अष्टावधानी शिवराय या पुस्तकावर आधारीत परीक्षा, एकदिवसीय स्थानिक शिबिर, दर रविवारी स्वाध्याय व सेवाकार्याची संधी आणि विभागीय शिबिरासाठी निवड अशी प्रक्रिया आहे,अशी माहिती यावेळी देण्यात आली.

युवक - युवतींसाठी संधी

जीवन कौशल्य, व्यवस्थापकीय कौशल्य आत्मसात करण्याची संधी

स्थानिक पातळीवर एकदिवसीय युवा नेतृत्व विकसन शिबिरात सहभागी होण्याची संधी

दर रविवारी चालणार्या स्वाध्यायमधून शारीरिक, बौद्धिक, भावनिक, आध्यात्मिक विकास

महाविद्यालयीन स्थानी नेतृत्व करण्याची संधी

देशभक्ती, सेवा, साहस व बौद्धिक यावर आधारित उपक्रमात सहभागाची संधी

विभाग पातळीवर होणार्या तीनदिवसीय युवा नेतृत्व विकसन शिबिरात सहभागी होण्याची संधी

उपक्रमात सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्र

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे शनिवारी पंढरपूरकडे प्रस्थान

## सोहळ्याची जय्यत तयारी

**पिंपरी :** अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून असणा-या पालखी सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे. आषाढी वारीसाठी आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी शनिवारी पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी वारकरी, भाविक आणि दिंड्या गुरुवारपासून आळंदीत दाखल होतील.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी प्रस्थान शनिवारी (२९ जून) देऊळवाड्यातून होणार आहे. मंदिरातून प्रस्थान आणि पहिल्या मुक्कामातील पाहुणचार घेतल्यानंतर ३० जून रोजी श्रींचा पालखी सोहळा पुणे मार्गे पंढरीला जाण्यास मार्गस्थ होतो. यापार्श्वभूमीवर आळंदी देवस्थानची तयारी पूर्ण झाली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ महाराज म्हणाले, की यंदाचा १९३ वा पालखी सोहळा आहे. २९ जून रोजी महाराजांच्या पालखीचे दुपारी चार वाजता प्रस्थान होईल. प्रस्थान सोहळ्यासाठी यावर्षी ४७ दिंड्यांना देऊळवाड्यात प्रवेश दिला जाणार आहे. प्रतिदिंडी ९० वारकरीच प्रस्थानासाठी मंदिरात येतील. चांदीच्या रथाला पॉलिश करण्यात आले आहे. देवांचे राजेशाही अंलकार, सरजाम, चांदीचे भांडे, सिंहासन सर्व तयारी पूर्ण झाली आहे. श्री गुरू हैबतबाबांनी ठरवून दिलेले प्रथेप्रमाणे सोहळा पार पडेल.

देवस्थान प्रतिनिधी, जिल्हा प्रशासन, दिंडेकरी, फडकरी, मानकरी, पोलिसा यंत्रणा, गावक-यांसमवेत बैठका झाल्या आहेत. आता प्रस्थान सोहळ्याची प्रतीक्षा आहे. प्रशासनाच्या सतत संपर्कात आहोत. वारक-यांसाठी पाणी, सुरक्षाची व्यवस्था केली. प्रशासनाकडून वैद्यकीय मदत पुरविली जात आहे. १४० वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध आहेत. शासनाचे चांगले सहकार्य मिळत आहे. पहिल्या विसावाच्या तयारीचा आढावा घेतला आहे. पहिल्या विसाव्यातील श्रींच्या पादुका पूजन, आरती प्रसंगी मंदिरात केवळ पासधारकांनाच सोडण्यात येणार आहे. अनावश्यक गर्दी करु नये, असे आवाहनही त्यांनी केले.

पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध केले आहेत. सिद्धबेट, नदी घाट, नवीन पुलासह संपूर्ण महत्वाच्या ठिकाणीची स्वच्छता पूर्ण झाली आहे. वारीकालावधीत तीन पाळ्यांमध्ये साफसफाई केली जाणार आहे. १८०० फिरत्या शौचालयांची उपलब्धता केली आहे. दिवाबत्तीची कामे पूर्ण झाली आहे. ६० ठिकाणी १३० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. तीन बोट तैनात ठेवल्या आहेत.-कैलास केंद्रे, मुख्याधिकारी,आळंदी नगरपरिषद

# पवार साहेबांच्या विचाराचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा : धैर्यशील मोहिते-पाटील



**टेंभुर्णी** : एकेकाळी सोलापूर जिल्ह्यात आमदार निवडून येण्याची संख्या पूणे जिल्ह्यापेक्षा संख्या जास्त होती.तर आगामी विधानसभा निवडणुकीत लोकसभेला ज्याप्रमाणे विजयदादा आणि पवारसाहेब यांच्या विचारावर प्रेरीत होऊन मला निवडून दिले त्याचप्रमाणे माढा विधानसभेतही पक्ष देईल त्या उमेदवाराला बहुमताने निवडून देऊन जिल्ह्यात राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवारांची संख्या वाढवाण्यासाठी प्रयत्न करावा असे अहवान करीत नुतन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा विधानसभा मतदार संघ जिंकण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दाखवून दिले.ते माढा लोकसभेतील बेंबळे जि.प.गट आयोजित संवाद दौऱ्यादरम्यान राजाभाऊ खटके-पाटील यांचे निवास्थानी सत्कार समारंभावेळी ते सभेत बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना मोहिते-पाटील म्हणाले कि मला माढा आणि करमाळा विधानसभा मतदार संघातून भरभरून मताधिक्य दिले आहे.मी आपल्या सेवेसाठी चोवीस तास कायम उभा आहे. तर येत्या काळातही आपण सर्वांनी माढा विधानसभेत शरदचंद्र पवारसाहेब आणि विजयसिंह मोहिते-पाटील हे जो कोण उमेदवार देतील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.असे अहवान त्यांनी केले.

यावेळी शिवतेजसिंह मोहिते-पाटील,सभापती शिवाजीराजे कांबळे,संजय कोकाटे,जिल्हा लेबर फेडरेशनचे माजी चेअरमन भारत पाटील,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष औदुंबर महाडीक-देशमुख,विनोद पाटील,गोविंद पवार,बाळासाहेब ढेकणे,दत्तात्रय ढवळे,ऋषिकेश बोबडे,सोमनाथ कदम,तांबवेचे माजी सरपंच राजाभाऊ खटके-पाटील,अकाश लोंढे,सुभाष खटके-पाटील,सचिन कांबळे,नवनाथ खटके-पाटील संदेश पाटील,अर्जुन खटके-पाटील,दिपक थोरात,प्रथमेश खटके-पाटील,आदीसह तांबवे ग्रामस्त उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते डॉ. मनोहर डोळे यांचा सत्कार

**नारायणगाव** : संस्थेचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त डॉ. मनोहर डोळे यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नारायणगाव येथील डॉक्टर मनोहर डोळे यांच्या हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली व डॉ. मनोहर डोळे यांचा केंद्रशासनाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



यावेळी त्यांनी प्रत्येक विभागाची सखोल माहिती घेऊन चालू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. तसेच मोफत नेत्र तपासणी शिबिरातून आलेल्या प्रत्येक रूग्णांची विचारपूस करून संवाद साधला. या मोहिमेमध्ये डॉ. डोळे मेडिकल फाउंडेशनला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

डॉ. डोळे फाउंडेशनच्या वतीने ग्रामीण व अदिवासी भागात चालू असलेल्या या सामाजीक कार्याचे त्यांनी कौतूक केले. याच मोहीमेतून आजपर्यंत दोन लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

याप्रसंगी कृषीरत्न अनिलतात्या मेहेर, पोपटशेठ घनवट, संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे, डॉ. स्मिता डोळे तसेच इतर पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

आठवले यांनी डोळे फाउंडेशनचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त डॉ. मनोहर डोळे, वय ९६ वर्षे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्बेतीची विचारपूस केली व याही वयात तितक्याच उमेदीने सामाजिक काम करत असल्याचे कौतूक केले. या भेटी दरम्यान संस्थेच्या चालू असलेल्या अद्ययावत मोबाईल आय क्लिनिक (डोळ्याचा फिरता दवाखाना) याची पाहणी केली व अशाच मोबाईल आय क्लिनिक गावोगावी सुरू केल्या तर गरीब व गरजू रुग्णांना त्यांच्या दारापर्यंत सुविधा देता येईल असं मत त्यांनी व्यक्त केले.

डोळे फाउंडेशनने आदिवासी व दलित समाजातील लोकांसाठी अनेक नेत्र शिबिरे आयोजित केली असून त्यातून अनेक रुग्णांना त्यांनी दृष्टी प्राप्त करून दिली आहे व समाजासाठी दृष्टीचे खूप मोठे योगदान दिलेल्या योग्य व्यक्तीला पदमश्री मिळाला आहे याचा आम्हांला अभिमान आहे, तसेच डॉ. डोळे यांच्या एवढ्या वर्षाच्या सेवाकार्याला माझा सलाम आहे असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. तसेच या संस्थेला मदत करण्याचेही आश्वासन दिले. उपस्थित मान्यवरांचे आभार विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी मानले.

# सातारा जि .प. अधिकारी यांच्या विरोधातील तक्रारीबाबत तातडीने कारवाईचे विभागीय आयुक्तांना सूचना

**सातारा** : सातारा जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत )श्रीमती अर्चना वाघमळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश खलिपे यांनी केलेल्या आर्थिक भ्रष्टाचाराबाबत व आरोग्य विभागातील गैरकारभाराबाबत श्री शशिकांत जाधव यांनी आरोप करून उपोषण केले होते. त्याची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी यांनी पुणे विभागीय आयुक्त यांनी तातडीने योग्य ती कारवाई करावी अशी सूचना केल्याचे पत्र दिल्याने खळखळ माजली आहे.

याबाबत माहिती अशी की ,सातारा जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अर्चना वाघमळे यांच्या भ्रष्टाचाराबाबत उपोषण करते श्री शशिकांत शिवाजी जाधव मुक्काम पोस्ट तारळे, जिल्हा सातारा यांनी २४ नोव्हेंबर २३ व एक जून २०२४ व २१ जून २०२४ रोजी लोकशाही मार्गाने लेखी तक्रार केली होती. या तक्रारीमध्ये प्रती ग्रामसेवक पाच हजार रुपये व ग्राम विकास अधिकारी यांच्याकडून सात हजार रुपये दिवाळी व मार्च महिन्यात कलेक्शन गोळा केले. तसेच खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली येथील अपहर व सरकारी सेवा केंद्राचे बनावट खोटे खाते उघडून घोटाळा केला आहे. सदर घोटाळा लपविण्यासाठी लॅपटॉप, मोबाईल जप्त करून पुरावा नष्ट करण्याचे काम केले. असा आरोप करून सामाजिक कार्यकर्ते शशिकांत जाधव हे पंधरा दिवसापासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते .परंतु याची कुठेही वाचत होऊ नये. म्हणून जिल्हा परिषदेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी अनेक यंत्रणेशी संपर्क साधला. असाही आरोप श्री सुनील बावधनकर यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

याचबरोबर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश खलिपे यांच्या अनियमित व

# विद्येचे माहेरघर बनले ड्रग्ज आणि पब्जचे माहेरघर : जयंत पाटील



**मुंबई** : विद्येचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुणे शहराची ही ओळख पुसून आता ड्रग्ज आणि पब्सचे माहेरघर अशी नवी ओळख निर्माण होत आहे. याला राज्यातील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गटाच्या सरकारचा नाकर्तेपणा जबाबदार आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला फटकारले आहे.

पुण्यातील एका नामवंत हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलांचे अमली पदार्थ सेवन करीत असल्याचे व्हिडिओ समाज माध्यमातून प्रसिद्ध झाल्यानंतर मोठी खळबळ माजली आहे. याप्रकरणी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पोलिसांबरोबरच उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांच्यावर लाचखोरीचे आरोप केले आहेत. खासदार मुरलीधर मोहोळ यांनी निर्देश दिल्यानंतर पुणे पोलिसांनी या प्रकरणी हॉटेलचा मालक, व्यवस्थापक आणि इतर आठ जणांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे. अमली पदार्थ सेवन करणाऱ्या अल्पवयीन मुलांनाही चौकशीसाठी बोलावले जाणार आहे.

याप्रकरणी जयंत पाटील यांनी समाज माध्यमातून सरकारवर टीका करणारी पोस्ट प्रसिद्ध केली आहे. मागील काही वर्षापासून पुणे शहरातील गुन्हेगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. देशभर गाजलेल्या ललित पाटील प्रकरणानंतर अल्पवयीन मुले ड्रग्सचे सेवन करीत असल्याचे व्हिडिओ प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिसांना जाग आली आहे. याचा अर्थ पोलिसांना आता खबरी नव्हे तर समाज माध्यमातून माहिती मिळत आहे. पुरषेकार प्रकरणात तर अल्पवयीन आरोपीचे थेट रक्त बदलण्यात आले. पैशाच्या जोरावर व्यवस्था कशी वाकवली जाऊ शकते, याचे हे उदाहरण आहे, अशी टीका पाटील यांनी केली आहे.

अशा प्रकारांमुळे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची उज्वल परंपरा असलेल्या आणि विद्येचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पुणे शहराला ड्रग्ज आणि पबचे माहेरघर अशी नवी ओळख मिळत आहे.. याला भाजप आणि शिंदे सरकारचा नाकर्तेपणा जबाबदार आहे, असा आरोप पाटील यांनी केला. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांशी संपर्क साधून या प्रकरणाची माहिती घेतली असून संबंधितांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना प्राध्यापकांनी तंत्रस्नेही असावे

**सातारा** : 'प्राध्यापकांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार तंत्रज्ञानात होणारे नवनवीन बदल स्वीकारून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत व सतत नावीन्याचा शोध घेऊन शिकत राहिले पाहिजे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना प्राध्यापकांनी तंत्रस्नेही असावे,' असे मत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे नूतन कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) सातारा शाखेच्यावतीने धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयात रविवारी (दि. २३) 'पदवी अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखडा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



**सातारा येथील धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के. शेजारी डॉ. राजेश निमट, डॉ. आर. के. चव्हाण, डॉ. विजय कुंभार, प्रा. एन. के. मुल्ला.**

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. आर. के. चव्हाण यांनी प्राध्यापकांनी सातत्याने आपल्या विषयामधील होणारे बदल, अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती याबद्दल प्रशिक्षण घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

या कार्यशाळेमध्ये विज्ञान


## साताऱ्यात 'सुटा'तर्फे एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

विद्याशाखा श्रेयांक आराखडा याविषयी सातारा जिल्हा 'सुटा'चे अध्यक्ष व विद्या परिषद सदस्य डॉ. राजेश निमट, वाणिज्य विद्याशाखा श्रेयांक आराखडा याविषयी कोल्हापूर जिल्हा सुटा अध्यक्ष डॉ. आर. जी. कोरबू व मानव्य विद्याशाखा श्रेयांक आराखडा याविषयी अधिसभा सदस्य प्रा. डॉ. प्रकाश कुंभार यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रामध्ये शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींविषयी प्रश्नोत्तरे व शंका निरसन घेण्यात आले.

या कार्यशाळेस 'सुटा'चे विद्यमान अध्यक्ष डॉ. आर. के. चव्हाण, प्रमुख कार्यवाह डॉ. ए. बी. पाटील, सिनेट सदस्य डॉ. मनोज गुजर, डॉ. ज्ञानदेव काळे, डॉ. शाहीन पटेल, प्रा. एन. के. मुल्ला, डॉ. ईला जोगी, प्रा. एस. एम. मेस्त्री, प्रा. आर. आर. गायकवाड, प्राचार्य डॉ. सतीश घाडगे, प्राचार्य डॉ. एस. एम. भोसले, प्र. प्राचार्य डॉ. विजयराव सावंत, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. विजय कुंभार, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. राजन मोरे, सातारा, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यशाळेचे 'सुटा'चे कार्यवाह डॉ. केशव मोरे यांनी प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. शाहीन पटेल व प्रा. मीना चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. 'सुटा'चे खजिनदार डॉ. ज्ञानदेव काळे यांनी आभार मानले.

# ग्राहकांना द्या सुरक्षित खाद्यानुभव : प्रमोद दहीतुले



पुणे : पुणे डिस्ट्रिक्ट केटरिंग असोसिएशन आणि फेडरेशन ऑफ कॉर्पोरेट अँड इंडस्ट्रियल केटरर्स च्या वतीने आयोजित 'हॉस्पिटॅलिटी अँड केटरिंग इंडस्ट्री समिट २०२४' या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन शनिवारी ,२४ जून २०२४ रोजी दुपारी १२ वाजता झाले. भारतीय अन्न आणि सुरक्षा मानक प्राधिकरणाचे विभागीय संचालक (एफएसएसएआय) प्रमोद दहीतुले , रूपा कानविंदे, पूना गेस्ट हाउस चे किशोर सरपोतदार, सुमेर सिंग, बिंद्रा हॉस्पिटॅलिटी केटरिंग चे प्रमुख जी.एस.बिंद्रा, पुणे डिस्ट्रिक्ट केटरिंग असोसिएशन चे अध्यक्ष सुरेश माळी आदि मान्यवर उपस्थित होते.

२४ जून २०२४ रोजी दुपारी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आणि २५ जून रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत ही परिषद शुभारंभ लॉन,डी.पी.रस्ता,म्हात्रे पूल येथे आयोजित करण्यात आली आहे.प्रियांका सूर्यवंशी यानी परिषदेच्या पहिल्या दिवशी मुख्य मार्गदर्शन केले.

हॉस्पिटॅलिटी,केटरिंग व्यवसायातील आवश्यक सरकारी परवानग्या, नियम, उद्योजकता मार्गदर्शन आणि या क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा झाली.पुणे डिस्ट्रिक्ट केटरिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश माळी यांनी स्वागत केले.फॉस्टाग ट्रेनिंग (फूड सेफ्टी ट्रेनिंग अँन्ड सर्टीफिकेशन) हे प्रशिक्षण घेतलेली किमान एक व्यक्ती प्रत्येक व्यवसायात असली पाहिजे, असे यावेळी सांगण्यात आले. सुपरवायजर ट्रेनिंग पहिल्या दिवशी पार पडले.त्यात दूध आणि दूग्धजन्य पदार्थ, पोल्ट्री, मांस, मासळी, तेल, पॅकेज्ड वॉटर, बेकरी, स्ट्रीट फूड, केटरिंग, स्टोरेज , उत्पादन , वाहतूक याबाबत माहिती देण्यात आली.

# भारतीय विद्या भवन,इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

पुणे : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'स्वर मोहिनी ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.भारतरत्न स्व.लता मंगेशकर यांनी गायलेल्या गीतांना उजाळा देणारा हा कार्यक्रम आसावरी चितळे प्रस्तुत करणार आहेत. ही गीते सौ.आसावरी चितळे,सौ.पद्मजा गोडसे गाणार आहेत. सौ.माधुरी कुलकर्णी कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.नरेंद्र चिपळूणकर,केदार परांजपे,राजेंद्र हसबनीस,अभय इंगळे हे वादक साथसंगत करणार आहेत.

हा कार्यक्रम शनीवार,दि.२९ जून २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.

# अलार्ड विद्यापीठ १९ जूनपासून कार्यान्वित

## राज्य सरकारची अधिसूचना

**पुणे** : देशाच्या प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी केंद्र व राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्याच अनुषंगाने पुणे येथे अलार्ड विद्यापीठ, स्थापनेस मंजूरी दिली होती. या संदर्भातील राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून व महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार शासनाचे उप सचिव अजित बाविस्कर यांनी अलार्ड विद्यापीठास १९ जून २०२४ पासून कार्यान्वित झाल्याचे निश्चित करीत आहोत असा उल्लेख असलेले एक पत्र नुकतेच या विद्यापीठास सोपविण्यात आले आहे.

या पत्रानुसार क्रमांक स्वअवि-२०२३ प्र.क्र.०२ विशि-४-महाराष्ट्र खाजगी विद्यापीठ (स्थापना व विनियम) अधिनियम, २०२३ ( २०२४ चा महा. ८) याच्या कलम ७ च्या पोट-कलम (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे हे निश्चित करण्यात आले आहे की पुणे येथील अलार्ड विद्यापीठ दि. १९ जून २०२४ पासून कार्यान्वित झाले आहे.



या संदर्भात अलार्ड विद्यापीठ, पुणेचे संस्थापक अध्यक्ष व कुलाधिपती डॉ. एल.आर.यादव यांनी राज्य आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे आभार मानले आहे. 'हम अलग है, हम अलार्ड है', यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाईल. व्यावहारिक शिक्षण आणि वास्तविक जगाच्या अनुभवावर लक्ष केंद्रित करून उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी समर्पित आहे. येथे ७० टक्के व्यावहारिक अध्यापन आणि ३० टक्के सिद्धांताचा एक अद्वितीय दृष्टीकोन असेल. विद्यार्थ्यांना १०० टक्के गॅरंटीड इंटर्नशिपची खात्री देते. विद्यापीठ सर्वसमावेशक शैक्षणिक कार्यक्रम आणि अत्याधुनिक सुविधांद्वारे भविष्यातील नेते आणि नवकल्पनांना आकार देण्यासाठी वचनबद्ध असेल.

# आ. महेश शिंदे यांच्यामुळे मिळाले अरबवाडीला पाणी व कोनशिलाला न्याय

**कोरेगाव** : कोरेगाव तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीचा जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे अरबवाडी तलावाला पाणी सोडणे हा प्रश्न आहे. हा प्रश्न निकालात काढण्यासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व आमदार महेश शिंदे यांनी०.१५ टीएमसी पाणी अरबवाडी तलावात सोडण्याचे काम मंजूर करून घेतले. या त्यांच्या कामगिरीमुळे अरबवाडी ,दुधनवाडी, बनवडी ,खामकरवाडी, अंबवडे , संमत वाघोली, पळशी आदी गावातील क्षेत्र ओलिताखाली येणार



आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात या कामाचे भूमिपूजन होईल. अशी माहिती आमदार व कृष्णा खोरे महामंडळाचे उपाध्यक्ष आ. महेश शिंदे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यालयात झालेल्या भरगच्च पत्रकार परिषदेत दिली.

कोरेगाव तालुक्यातील भाग्यविधाचे व विधानसभेचे माजी अध्यक्ष शंकरराव जगताप साहेब यांचे स्वप्न साकार झाल्याचे समाधान वाटत आहे. स्पष्ट करून आ. शिंदे यांनी सांगितले की ,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठपुरावा केल्यामुळे अरबवाडी तलावाला पाणी सोडण्यात येणार आहे. मागील लोकप्रतिनिधीची इच्छाशक्ती व अभ्यास कमी पडत होता. त्यासाठी स्थानिक भूमिपुत्रांच्या प्रश्न हा स्थानिक भूमिपुत्र सोडवतो. हे सिद्ध झालेले आहे. प्रश्न समजून घेण्यासाठी भूमिपुत्र असावा लागतो. याचे त्यांनी पुनर्विचार केला. आ. शशिकांत शिंदे आजही त्यांना उच्च न्यायालयाने जामीन नाकारला आहे. कायद्यानेच काम होत असल्याचेही त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला आठवण करून दिली. या पत्रकार परिषदेला कोरेगाव तालुक्यातील ग्रामस्थ तानाजी गोळे, मनोज गाढवे, हनुमंत नलगे, पोपट दिघे, दीपक काशीद, व युवा नेते राहुल बर्गे निलेश नलवडे उपस्थित होते..कोरेगाव तालुका टँकर मुक्त करण्याचे स्वप्न असून कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पदभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्या दिवशी कामाला सुरुवात केली आहे. कोरेगाव मतदार संघ टँकर मुक्त करावा यासाठी पाठपुरावा करत असून संपूर्ण क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभ होत आहे या भूमिपूजन कार्यक्रमाला नवनिर्वाचित खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले उपस्थित राहणार असे त्यांनी सांगितले.